प्रकरण - **14**

रुग्णालयाकडून मिळणा-या सवलती, परवानग्या / मान्यता यांचा तपशील

रुग्णालयामध्ये कायमस्वरुपी गरीब रुग्ण सहायता निधी उपलब्ध आहे. सदर निधीचा उद्देश गरीब व गरजू रुग्णांना मदत करण्याचा आहे. त्यासाठी मर्यादित निधी उपलबध केलेला असून गरजेनुसार निधीचा वापर करण्यात येतो. या निधीचा उपयोग करण्यासाठी रुग्ण दारिद्रय रेषेखालील असावा लागतो. त्याचबरोबर संबंधित डॉक्टरानी बाहय व आंतर विभागातील केसपेपरवर संबंधित रुग्णांची पुर्ण चिकित्सा लिहीणे आवश्यक असते.

सदर सहायता निधीसाठी समाज विकास अधिका-याकडे अर्ज करणे आवश्यक आहे. हा अर्ज मोफत दिला जातो. संबधित रुग्ण आॅणि त्याचे नातेवाईक यांच्या मुलाखतीनंतर समाज विकास अधिकारी स्वतःच्या अभिप्रायासह मंजुरीसाठी प्रमुख वैद्यकिय अधिका-याकडे पाठविला जातो. यासाठी एक दिवसाचा अवधी लागतो.

आवश्यक असणारी औषधे खरेदी करुन रुग्णाला पुरवली जातात. बाहेरील तपासण्यांसाठी शक्य ते सहाय्य केले जाते.

महानगरपालिकेच्या हददीबाहेर मृतदेह नेण्यासाठी रुग्णालयाच्या वतीने मृत व्यक्तिच्या नातेवाईकांना परवानगी देण्यात येते.